आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२३ सप्टेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातल्या ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना दोन हजार २१५ कोटी रुपये मदत करण्याचे शासन आदेश जारी/ पूरग्रस्त भागाची पाहणी करण्याचे मंत्र्यांना निर्देश

- राज्यात अतिवृष्टीमुळे ७० लाख एकरांवरच्या पिकांचं नुकसान झालं असल्याचा कृषीमंत्र्यांचा अंदाज

- ईपीएफओ, मधे यंदाच्या जुलै महिन्यात २१ लाखांपेक्षा जास्त नवीन सदस्य नोंदणी

**आणि**

- 71व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण

**<><><><><><>**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातल्या ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना दोन हजार २१५ कोटी रुपये मदत करण्याचे शासन आदेश दिले असून १ हजार ८२९ कोटींची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. उर्वरित रक्कम येत्या दहा दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. मदत जाहीर करण्याची प्रक्रिया निरंतरपणे चालू राहणार असून यापुढेही मदत निधीचे जीआर वितरीत केले जातील, असही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

अहिल्यानगर, सोलापूर, बीड, परभणी या भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. आतापर्यंत ९७५ मिलिमीटर पाऊस झाला असून सरासरी पेक्षा १०२ टक्के जास्त पाऊस झाला आहे. पुरामुळे आठ जणांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी झाले आहेत. पूरग्रस्त भागात एनडीआरएफ, एसडीआरएफच्या सतरा

तुकड्या तैनात केल्या आहेत. या भागांचा आढावा घ्यायला मंत्र्यांना आणि पालकमंत्र्यांना सांगितलं आहे, आपण स्वतः काही भागांना भेट देणार आहोत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

अतिवृष्टीमुळे ७० लाख एकरावरच्या पिकांचं नुकसान झालं असल्याचा अंदाज कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत व्यक्त केला.

**बाईट... भरणे**

जिथे अद्याप पंचनामे झालेले नाहीत किंवा आणखी नुकसानी झालेली असण्याची शक्यता आहे तिथे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत पोहोचवली जाईल असं आश्वासन भरणे यांनी दिलं.

राज्यात गेल्या काही दिवसात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती उद्भवली असून अनेक ठिकाणी पिकांचं नुकसान झालं आहे. तसंच पशुधन वाहून घेलं असून घरांचही नुकसान झालं असल्यानं राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. पुढच्या काही दिवसात राज्यात आणखी पावसाचा अंदाज असून अतिवृष्टीचा इशारा असलेल्या भागात जीवित आणि वित्तहानि रोखण्याच्या दृष्टीनं पावलं उचलावी असंही वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

नाशिक जिल्ह्यात गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यानं, विसर्गात वाढ करण्यात आली आहे. धरणातून सध्या दोन हजार २७२ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

पैठणचं जायकवाडी धरण जवळपास पूर्ण भरलं असून, धरणात सध्या ९२ हजार ३९ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे धरणातून सध्या

एक लाख तीन हजार ७५२ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

मांजरा धरणातून ४३ हजार ५१६, माजलगाव धरणातून एक लाख १५ हजार २४३, तर सिना कोळेगाव प्रकल्पातून ७० हजार दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग होत आहे.

**<><><><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज जाणून घेऊ या प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेबद्दल....

**व्हीसी**

देशातल्या युवांना कुशल बनवण्यासाठी अकरा वर्षांपूर्वी केंद्र सरकारने स्कील इंडिया योजना सुरू केली. याच योजनेचा भाग म्हणून १५ जुलै २०१५ ला प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना सुरू करण्यात आली. या योजने अंतर्गत गेल्या दहा वर्षात देशातल्या हजारो युवकांनी विविध क्षेत्रातलं कौशल्य आत्मसात केलं आहे. या योजनेच्या उद्दिष्टाबद्दल बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले होते.....

**होल्ड बाईट मोदी**

या योजने अंतर्गत गेल्या दहा वर्षात एक कोटी ६३लाख युवांना प्रशिक्षित करण्यात आलं आहे. यात ४५ टक्के वाटा महिलांचा आहे. आता योजनेचा चौथा टप्पा सुरू झाला असून पुढील वर्षभर तो राबवला जाईल. या योजनेचा लाभ घेऊन कुशल झालेल्या युवांना नोकरी तर मिळत आहेच, शिवाय स्वतःचा व्यवसायही उभारायला मदत मिळत आहे. ऐकूयात या योजनेच्या लाभार्थ्यांची एक प्रातिनिधिक प्रतिक्रिया....

**होल्ड बाईट**

**<><><><><><>**

ईपीएफओ, अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने यंदाच्या जुलै महिन्यात २१ लाखांपेक्षा जास्त नवीन सदस्य नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत यंदा ५ पूर्णांक ५५ शतांश टक्के वेतनपट वाढ झाल्याचं याबाबतच्या अहवालात म्हटलं आहे. यामधून रोजगाराच्या संधीत वाढ झाल्याचं आणि कर्मचाऱ्यांमध्ये आपल्याला मिळणाऱ्या लाभांबाबत अधिक जागरूकता निर्माण झाल्याचं स्पष्ट होत आहे.

यंदाच्या जुलै महिन्यात ९ लाखांपेक्षा जास्त नवीन सदस्यांनी ईपीएफओमध्ये नोंदणी केली असून, यामध्ये १८ ते २५ वयोगटातल्या सुमारे ५ लाख ९८ हजार सदस्यांचा समावेश आहे. तसंच यंदाच्या जुलै महिन्यात दोन लाखांपेक्षा जास्त नवीन महिला सदस्य ईपीएफओशी जोडल्या गेल्या, अशी माहिती कामगार आणि रोजगार मंत्रालयाने दिली.

**<><><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा कालपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. कृषी क्षेत्रातील नव्या कररचनेविषयी जाणून घेऊयात आमच्या प्रतिनिधीकडून...

**व्हीसी**

*(जीएसटी सुधारणेमुळे कृषी क्षेत्रात अनेक अनुकूल बदल होणार आहेत. नव्या कररचनेमुळे खतं, कीटकनाशकं यांच्या किमती कमी होतील. ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचे विविध भाग, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, कापणी यंत्र या सर्वांवरचा जीएसटी आता ५ टक्के झाला आहे. यामुळे यांत्रिकीकरणाला चालना मिळेल तसंच अंगमेहनतही वाचेल. ठिबक-तुषार सिंचन कमी किमतीत उपलब्ध झाल्यामुळे अधिक जमीन ओलिताखाली येईल, याचा परिणाम उत्पादन वाढीवर होणार आहे. फळं, भाज्या,*

*लोणी, तूप यांच्यावरचा जीएसटी ५ टक्के झाला असून दूध आणि पनीरवरचा जीएसटी शून्य करण्यात आला आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढायला मदत मिळणार आहे. सौर ऊर्जेवर आधारित उपकरणांचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के झाला आहे. त्यामुळे सौर पम्पाचा वापर जास्तीत जास्त होईल आणि शेतकऱ्यांचा सिंचनाचा खर्च वाचेल.)*

**<><><><><><>**

स्वच्छतेचं महत्त्व सर्वांच्या मनावर ठसवण्यासाठी सुरु झालेल्या स्वच्छता ही सेवा या अभियानात आत्तापर्यंत देशभरातले दीड कोटीपेक्षा जास्त नागरिक सहभागी झाले आहेत. केंद्रीय आवास आणि शहरी विकास मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार या अभियानांतर्गत आत्तापर्यंत देशात ११ लाखापेक्षा जास्त ठिकाणं ठरवून दिली असून यापैकी जवळपास अडीच लाख ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत विविध ठिकाणी अनेक कार्यक्रम, उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत 71वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करणार आहेत. मल्याळी चित्रपट अभिनेता मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार शाहरुख खान यांना जवान या चित्रपटासाठी तर विक्रांत मस्सी यांना 12th फेल या चित्रपटासाठी प्रदान करण्यात येईल. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार राणी मुखर्जी यांना मिसेस चटर्जी वर्सेस नॉर्वे या चित्रपटासाठी प्रदान करण्यात येईल. सर्वश्रेष्ठ चित्रपटाचा पुरस्कार 12th फेल या चित्रपटाला मिळणार आहे. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार द केरला स्टोरी साठी सुदीप्तो सेन यांना तर रॉकी और रानी की प्रेम कहानी ला सर्वाधिक लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे.

नवी दिल्लीच्या विज्ञान भवनात आज संध्याकाळी होणाऱ्या कार्यक्रमाला माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव देखील उपस्थित असतील.

**//<><><><><><>//**